# प्रतिज्ञापत्र

"आप्पासाहेब खोत यांच्या कथेतील स्त्रीविषयक जाणिवा" ह्या विषयावरील प्रस्तुत प्रबंध मी शिवाजी विद्यापीठाच्या एम. फील. (मराठी) पदवी परिक्षेसाठी लिहिला आहे. हा प्रबंध अथवा त्याचा कोणताही भाग मी अन्यत्र कोठेही कोणत्याही परिक्षेसाठी सादर केलेला नाही.

स्थळ : कोल्हापूर
दिनांक : १९/०७/०८

निलिमा पाटील
(अभ्यासक)

# प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, कु. निलिमा शामराव पाटील यांनी **''आप्पासाहेब खोत यांच्या कथेतील स्त्रीविषयक जाणिवा''** या विषयावरील प्रबंधिकेचे संशोधनकार्य माझ्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केले आहे.

ही प्रबंधिका स्वतंत्ररित्या लिहिली असून यापूर्वी कोणत्याही विद्यापीठात अन्य परिक्षेसाठी सादर केलेली नाही.

सदरची प्रबंधिका शिवाजी विद्यापीठाच्या एम. फिल. (मराठी) पदवीसाठी सादर करण्यास माझी अनुमती आहे.

स्थळ : कोल्हापूर
दिनांक : १८/०७/०८

**प्रा. डॉ. प्रभावती येळगांवकर**
(मार्गदर्शक)

# ऋणनिर्देश

आप्पासाहेब खोत हे प्रथितयश लेखक आहेत. त्यांनी कथा, कादंबरी, चरित्र अशा वेगवेगळ्या प्रकारचे लेखन केले आहे. तसेच कथाकथन या क्षेत्रामध्ये आपल्या स्वतंत्र प्रतिभेचा ठसा उमटविला आहे. ग्रामीण भागात राहून त्यांनी आपल्या साहित्यातून बदलत्या ग्रामीण जीवनाचा वेध घेतला आहे. बदलत्या कृषी संस्कृतीचे चित्रण आणि झपाट्याने होणारे खेड्याचे शहरीकरण याचबरोबर माणसा-माणसात होणारे वाद-वैर, हेवे-दावे, माणुसकी हरवत चाललेली माणसे याचे चित्रण त्यांच्या साहित्यातून येते व त्यांचे साहित्य वाचताना त्यांच्या कथेतून त्यांनी उभी केलेली ग्रामीण स्त्री, तिचे जीवन, तिचे दु:ख प्रभावीपणे चित्रीत झालेले आहे. त्यामुळे त्याचा अभ्यास सुसूत्रपणे करणे गरजेचे आहे. शिवाय आप्पासाहेब खोत हे माझे आवडते लेखक तर आहेतच पण त्याचबरोबर ते माझे गुरुही आहेत. त्यामुळे त्यांच्या कथा मी पुन्हा पुन्हा वाचल्या. त्यामुळे त्यातील स्त्री पात्रांची माझ्याशी अधिक मैत्री झाली. त्यांच्या स्त्री पात्रांना एक स्वतंत्र अस्तित्व आहे. त्या चिरकाल स्मरणात राहतात. आलेल्या परिस्थितीशी तोंड देत जगणाऱ्या त्यांच्या कथेतील स्त्रिया पहावयास मिळाल्या. देश, धर्म, जात, समाज कोणताही असो प्रत्येक ठिकाणी स्त्री जीवन हे दु:खमय असते याची तीव्र जाणीव त्यांच्या कथा वाचल्यानंतर झाली.

कुटुंबात स्त्रीला असणारे दुय्यम स्थान, नवरा, मुले यांना मानसिकदृष्ट्या जोपासणारी, स्वत:ची सुखदु:खे बाजूला ठेवून प्रसंगी उपाशी राहून कुटुंबाचे भरण-पोषण करणारी, पोटासाठी दिवसभर शेतावर राबणारी, रात्री जागून, सकाळी लवकर उठून घरच्या लोकांसाठी स्वयंपाक-पाणी करण्यात सतत कामाला जुंपलेली अशी स्त्री, समाजात तिचे स्थान दुय्यम दर्जाचे आहे. घरच्यांच्या पोटात चार घास पडावेत म्हणून ढोरकष्ट करुन स्वत: मात्र उपाशी राहणारी, स्वत:च्या भाव-भावना, स्वप्ने, सुखाच्या कल्पना हे घरातील कचऱ्याप्रमाणे बाजूला

सारणारी, पती, मुले, सासू-सासरे, दीर, भाऊ, आई-वडील यांच्यासाठी राबणाऱ्या आप्पासाहेब खोतांच्या कथेतील स्त्री नायिका मला भावल्या एक स्त्री म्हणून या स्त्रियांची दु:ख, त्यांचे जीवन जाणून घेण्याचे कुतुहल कळत-नकळत मनात निर्माण झाले व त्याचीच परिणती त्यांच्या कथेतील स्त्रियांच्या जाणिवा जाणून घेण्यामध्ये झाली. त्यांच्या कथांमधील स्त्री जीवन कसे आहे? तिच्यासमोर कोणत्या समस्या आहेत? या समस्या सोडवताना तिला कोणत्या संघर्षाला, परिस्थितीला तोंड द्यावे लागते? याचा विचार येथे प्रामुख्याने केला आहे. जे जे वास्तव म्हणून दिसले आणि जाणवले ते ते प्रामाणिकपणे मांडण्याचा येथे नम्र प्रयत्न केला आहे. स्त्री जीवनाचे चित्रण करत असताना स्त्रीचे अनुभवविश्व तिच्यावर अवतीभोवतीच्या परिस्थितीचे, परंपरेचे, व्यक्तीचे परिणाम काय व कसे होतात याचा अभ्यास प्रामुख्याने केला आहे. एक ग्रामीण साहित्यिक म्हणून आप्पासाहेब खोत याचा स्त्रीविषयक दृष्टीकोन काय आहे याचाही विचार येथे केला आहे.

यासाठी अनेकांचे मदतीचे हात पुढे सरसावले. त्या सर्वांची मी अत्यंत ऋणी आहे. माझे मार्गदर्शक डॉ. प्रभावती येळगांवकर यांची मी अत्यंत ऋणी आहे. त्यांनी केवळ या शोध प्रबंधिकेचे मार्गदर्शनच केले नाही तर अभ्यासाची एक चिकित्सक दृष्टी व दिशा दिली. याचबरोबर शिवाजी विद्यापीठाचे डॉ. विश्वनाथ शिंदे, डॉ. कृष्णा किरवले तसेच डॉ. रवींद्र ठाकूर यांचेही वेळोवेळी सहकार्य लाभले.

लेखक आप्पासाहेब खोत व सौ. लतादेवी व त्यांची मुले तसेच माझे बंधू श्री. विलास पाटील यांच्या बहुमोल सहकार्यामुळेच मी ही प्रबंधिका पूर्णत्वास नेऊ शकले. त्याबद्दल त्यांचे आभार मानावे तितके थोडेच. वारणा महाविद्यालयाचे प्राध्यापक सर्जेराव जाधव यांनी आपल्या महाविद्यालयातील अनेक पुस्तके उपलब्ध करुन दिली. त्याचप्रमाणे या कार्यात ज्यांनी मला लहान-मोठी मदत केली त्या सर्वांचे मी मन:पूर्वक आभार मानते.

**कु. निलिमा पाटील**

# अनुक्रमणिका


| अ.नं. | प्रकरणाचे नांव | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| प्रकरण – १ | ग्रामीण कथेचे स्वरुप, विकास व आप्पासाहेब खोत यांची ग्रामीण कथा | १ ते ३४ |
| प्रकरण – २ | प्रा.आप्पासाहेब खोत यांचे वाङ्.मयीन व्यक्तिमत्त्व | ३५ ते ६५ |
| प्रकरण – ३ | आप्पासाहेब खोत यांच्या कथेतील ग्रामीण स्त्री जीवनाचे चित्रण | ६६ ते १०२ |
| प्रकरण – ४ | आप्पासाहेब खोत यांच्या कथेतील स्त्री नायिकांच्या समस्या–संघर्ष | १०३ ते १४६ |
| प्रकरण – ५ | उपसंहार | १४७ ते १६० |
| परिशिष्ट – १ | प्रा. आप्पासाहेब खोत यांची मुलाखत | १६१ ते १६९ |
| परिशिष्ट – २ | प्रा. आप्पासाहेब खोत यांचे मित्र प्रा.शाम माने यांची मुलाखत | १७० ते १७४ |
| परिशिष्ट – ३ | आप्पासाहेब खोत यांचे प्रकाशित साहित्य | १७५ |
| परिशिष्ट – ४ | आप्पासाहेब खोत यांना लाभलेले मान–सन्मान | १७६ |
| परिशिष्ट – ५ | संदर्भ सूची | १७७ ते १७८ |